# सामाजिक न्यायाचे प्रणेते राजर्षी शाहू महाराज

**डॉ. शेषनारायण वडवे,** डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, पेठ वडगाव, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर.

---

**प्रस्तावना :**

न्यायाची संकल्पना प्राचीन काळापासूनच राजकीय चिंतनाचा महत्त्वपूर्ण असा विषय राहिलेली आहे. संस्कृतीच्या उदयापासून प्रत्येक सामाजिक व्यवस्था कल्याणकारी राज्याचा दर्जा मिळविण्यासाठी आणि आपल्या प्रत्येक सदस्याला आनंद मिळवून देण्यासाठी कठोर परिश्रम करत आहे. प्रत्येक कल्याणकारी राज्याचे अंतिम ध्येय म्हणजे त्याच्या सीमांमध्ये न्याय स्थापित करणे आणि राखणे. न्याय ही एक अतिशय व्यापक आणि गतिमान संकल्पना आहे ज्याचा एक विशाल कॅनव्हास आहे जो विशिष्ट मर्यादांमध्ये मर्यादित राहू शकत नाही. 'न्याय' या शब्दाचे अनेक आणि वैविध्यपूर्ण पैलू आहेत. न्यायाशिवाय शांतीची कल्पना करता येत नाही आणि पुढे न्यायाशिवाय समाजात कायदा आणि स्थिरता असू शकत नाही. पूर्वी लोक न्यायाचा विचार करत होते पण सामाजिक न्याय बाजूला राहून जात होता. आज लोकांना सामाजिक न्यायाची आवश्यकता आहे. सामाजिक न्यायाची खरी गरज कोणाला असते तर जो समाजात अल्पसंख्याक असतो, दुर्बल असतो त्यांना सामाजिक न्यायाची आवश्यकता असते. सामाजिक न्यायात न्यायाचे विविध महत्त्वाचे घटक समाविष्ट आहेत. सामाजिक न्याय हा कल्याणकारी राज्याचा पाया आहे.

परंपरेने सामाजिक-आर्थिक व सांस्कृतिक विषमतेवर आधारित समाजांमध्ये आज 'सामाजिक न्याय' च्या संकल्पनेचे खूप आकर्षण आहे. शतकानुशतके वरचढ राहिलेल्या घटकांनी सत्ता-संपत्ती व प्रतिष्ठा यांचा मोठा वाटा बळकावला आणि बहुसंख्य समाजाला या तिन्ही गोष्टींना वंचित ठेवले. लोकशाही मूल्यांची समाजात रुजुवात झाल्यानंतर ही परंपरागत विषमता असह्य झाली आणि यातूनच सामाजिक न्यायाची कल्पना प्रचलित झाली. समाजात ज्या वस्तूंची व सेवांची निर्मिती होते त्यांचे वितरण संपूर्ण समाजभर रास्त व योग्य प्रकारे झाले पाहिजे. सर्वांच्या अन्न-वस्त्र-निवारादी प्राथमिक गरजा भागल्याच पाहिजेत. त्या गरजा भागवण्याचा प्रत्येकाला हक्क असला पाहिजे. त्याखेरीज ज्या वस्तू व सेवा निर्माण होतील त्यांचे समतेच्या, न्यायाच्या व रास्ततेच्या तत्त्वावर वाटप झाले पाहिजे - ही सामाजिक न्याय या संकल्पनेची मुख्य सूत्रे आहेत.

ज्या समाजव्यवस्थेने हजारो वर्षे बहुसंख्य समाजघटकांना सामाजिक न्याय नाकारला आणि आजही जाती-धर्माच्या पारंपारिक व ताठर चौकटींना कवटाळून जी उभी आहे. ती समाजव्यवस्था आणि तिला आधारभूत असलेली मूल्यव्यवस्था उखडून त्या जागी नवसमाजनिर्मिती केल्याखेरीज सामाजिक न्याय मिळणे शक्य नाही अशी खात्री सामाजिक न्यायाच्या पुरस्कर्त्यांना वाटते. त्यामुळे ते 'जैसे थे वादाशी सहमत होऊ शकत नाहीत, ते परिवर्तनवादीच होतात. सर्वांना त्यांच्या प्राथमिक गरजा पूर्ण करून द्यायच्या म्हणजे काहींच्या चैनींवर मर्यादा घालण्याचे कार्य राज्यसंस्थेला अपरिहार्यतः पार पाडावे लागते यातून दोन गोष्टी घडतात. एक, राज्यसंस्थेच्या कार्यकक्षेत पूर्वी नसलेल्या अनेक गोष्टी नव्याने त्यात समाविष्ट होतात आणि 'राज्यसत्तेने व्यक्ती - स्वातंत्र्यात हस्तक्षेप करू नये' या अनिर्बंध स्वातंत्र्यवादी (लेसे फेर) कल्पनेला मुरड घालावी लागते. सामुदायिक हिताखातर व्यक्तीच्या हितावर मर्यादा घालण्यात काहीही गैर नाही ही समाजवादी भूमिका स्वीकारावी लागते. ज्या ज्या वेळी समुदायाचे हित आणि व्यक्तीचे हित यात अंतर्विरोध उभा राहतो त्या त्या वेळी समुदायाचे हित ग्राह्य मानणे सामाजिक न्यायात अभिप्रेत असते. भारतीय समाजव्यवस्थेत ऐतिहासिकदृष्ट्या जातिव्यवस्थेमुळे सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक विषमता निर्माण झाली. या पार्श्वभूमीवर सामाजिक न्यायावर राजर्षी शाहू महाराजांनी तेवढा खोलवर, व्यापक आणि सातत्याने विचार केला तेवढा यापूर्वी भारतामध्ये कोणी केलेला दिसत नाही. राजर्षी शाहू महाराजांनी समाज परिवर्तनासाठी प्रबोधन, शिक्षण आणि कायदेशीर उपाययोजना यांवर भर दिला. त्यांची विचारधारा सामाजिक न्यायाच्या आधुनिक तत्त्वांशी सुसंगत आहे.

**राजर्षी शाहू छत्रपतींचे विचार आणि सामाजिक न्यायाची चर्चा :**

आपल्या देशाला फुले-शाहू-आंबेडकर यांची विचार परंपरा लाभलेली आहे. याचा परंपरेतल एक अतिशय महत्वाच आणि समग्र क्रांतीच स्वप्न पाहणार ठिकाण म्हणजे राजर्षी शाहू महाराज होय. राजर्षी शाहू महाराजांचे स्वप्न समग्र परिवर्तनाचे होते. समग्र परिवर्तन याचा अर्थ समाजाच्या सर्व क्षेत्रामध्ये सम्यक परिवर्तन घडवून आणणे आणि दुसरा महत्वचा मुद्दा म्हणजे सामाजिक न्यायाचा. सामाजिक न्यायावर राजर्षी शाहू महाराजांनी तेवढा खोलवर, व्यापक आणि सातत्याने

विचार केला तेवढा यापूर्वी भारतामध्ये कोणी केलेला नव्हता. लोक न्यायाचा विचार करत होते पण सामाजिक न्याय बाजूला राहून जात होता. त्यामुळे राजर्षी शाहू महाराजांच्या जीवनातले हे दोन महत्वाचे पैलू आहेत. एक म्हणजे समग्र परिवर्तन आणि दुसरं म्हणजे सामाजिक न्याय.

**समग्र परिवर्तन :**

समग्र सामाजिक परिवर्तन करताना राजर्षी शाहू महाराजांपुढे सर्वात मोठे आव्हान होत ते म्हणजे जातव्यवस्थेच. जातव्यवस्था जोपर्यंत टिकून राहील तोपर्यंत सामाजिक परिवर्तन होणार नाही. जातीने तयार केलेली, मनुने तयार केलेली, कर्मकांडांनी तयार केलेली विषमता काही संपणार नाही आणि माणूस जर विषमता घेऊन जगत असेल तर परिवर्तन कसे होणार? म्हणून त्यांनी सर्वप्रथम अस्पृश्यता निवारणाला हात घातला. या प्रश्नाच्या सोडवणूकीसाठी त्यांच्याकडे एक खोलवर अशी विचारधारा होती. आपले संस्थान जातिमुक्त करावयाचे आहे आणि त्यासाठी अनेक वेगवेगळे क्रांतिकारक प्रयोग करावे लागतील याची त्यांना जाणीव होती आणि त्यांनी तसे प्रयोग केल्याचे आपणास दिसून येते. पहिला प्रयोग त्यांनी असा केला की या मागासलेल्या जाती आहेत आणि या मागासलेल्या जातीचे मागासलेपणाचे मुख्य कारण शिक्षण आहे. महात्मा फुलेंनी सांगून ठेवल होत की 'विद्येविना मती गेली' माणसाच्या आडाणीपनाचे, अविकासाचे सर्वात महत्वाचे कारण म्हणजे अविद्या आहे. ही अविद्या संपवून त्यांच्यापर्यंत विद्या नेहण्यासाठी पहिल्यांदा त्यांनी अस्पृश्यांसाठी शिक्षण सक्तीचे केले.

शाहू महाराजांनी त्यांच्यासाठी शाळा सुरु केल्या. मुले शाळेत येतील म्हणून त्यांना भेडसावणारे जे प्रश्न होते ते सोडविले. त्यांना कपडे दिले, त्यांची फी माफ केली, त्यांना जेवण दिले, त्यांना वसतिगृह दिल आणि सक्तीच्या शिक्षणाचा कायदा आपल्या महाराष्ट्रामध्ये पहिल्यांदा झाला तो शाहू महाराजांच्या संस्थानामध्ये. राजर्षी शाहू महाराजांनी नुसताच कायदा केला नाही तर जे पालक आपल्या पाल्याला शाळेत पाठविणार नाहीत अशांना उचलून तुरुंगात घालण्याची सोय होती. आता मुलांनी शिकल्यानंतर काय करायचे? आपल्या ज्ञानाचा वापर करण्याची संधी जर त्यांना मिळाली नाही तर तो समाज शिक्षणापासून दूरदूर जायाला लागतो. त्याला शिक्षण घेतल्यानंतर विकासाची संधी मिळायला हवी. म्हणून शाहू महाराजांनी अशा अस्पृश्य लोकांना नोकऱ्या देण्यास सुरुवात केली. अस्पृश्यांना नोकऱ्यात चांगला सहभाग मिळावा, चांगला हिस्सा मिळावा म्हणून त्यांनी पहिल्यांदा राखीव जागांचा कायदा केला. कुणबी मराठयापासून ते महार-मातंगापर्यंत ५०% राखीव जागा या वर्गासाठी ठेवल्या.

जातीत राहून तुंम्ही जातीचेच व्यवसाय केले तर जाती संपत नाहीत म्हणून राजर्षी शाहू महाराजांनी जातीबाह्य व्यवसाय करण्यास प्रवृत्त केले. कोणी नोकरी करावी, कोणी शेती करावी, ही बलुतेदाराची कामे सोडावे. तुंम्ही वेगवेगळे व्यवसाय करा असे सातत्याने आव्हान करीत राहिले. त्याला प्रतिसादही मिळाला. त्यामुळे अनेक अस्पृश्य अनेक मोक्याच्या जागेवर गेले. कोणी वकील झाले, गंगाराम कांबळेसारख्या महार समाजातील माणसाला शाहू महाराजांनी महानगरपालिकेसमोर हॉटेल सुरू करून दिले आणि त्या हॉटेलचे पहिले ग्राहक स्वतः शाहू महाराज होते. हे ते का करत होते? तर एखादी प्रथा मोडायची असेल तर ते स्वतः पासून सुरुवात करायचे. प्रत्येक क्रांतिकारी कायदा करताना ते स्वतः पासून सुरुवात करायचे. ते स्वतः कधी क्षत्रियपण समजत नसेल. मी तुमच्यातलाच एक आहे असे समजत होते. मी तुमचा सेवक आहे असे ते स्वतःला मानत असे. समाज पुढे घेऊन जाण्याचा नेहमी त्यांनी प्रयत्न केला आणि त्यातून अस्पृश्यता संपविण्याचा प्रयत्न केला.

जर आंतरजातीय विवाह झाले तर अस्पृश्यता संपविण्यास आणखीन मदत होईल हे पण शाहू महाराजांच्या लक्षात आले होते. कारण यापूर्वी महात्मा फुलेंनी अशी आंतरजातीय लग्न करून दिल्याची उदाहरणे होती. शाहू महाराजांनी आंतरजातीय विवाहचा विषय अधिक व्यापक केला आणि त्याची सुरुवात आपल्या घरातून केली. त्यांनी आपल्या स्वतःच्या बहिणीचे लग्न आंतरजातीय केलं. धनगर जातीतल्या होळकर कुटुंबात आपली बहीण दिली. या आपल्या कल्पनेला अधिक पाठिंबा मिळावा म्हणून त्यांनी आपले सेवक महाराष्ट्रात आणि महाराष्ट्राचे सीमेवर पाठवून घोषणा केली की, जे तरुण-तरुणी आंतरजातीय विवाह करण्यास उत्सुक आहेत त्यांच्या लग्नाचा खर्च स्वतः महाराज आपल्या तिजोरीतून करणार आहेत. विशेष बाब म्हणजे महाराजांच्या घोषणेला अनेक तरुण-तरुणींनी पाठिंबा दिला.

शाहू महाराजांच्या मते, जात नुसती संपविण्याची घोषणा करून चालत नाही तर ती संपविण्यासाठी त्याचे सर्व मार्ग शोधायला पाहिजेत आणि ते सर्व मार्ग शाहू महाराज शोधत होता. त्यांच्या प्रयत्नातूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना

'कनायक' सुरू करण्यास मदत मिळाली. त्यांनीच माणगाव येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसाठी मोठी अस्पृश्यपरिषद घेतली होती. त्या परिषदेत त्यांनी एक राजकीय सूत्र मांडले की, तुमच्या समाजातील माणूसच तुमचा नेता होऊ शकतो. गाईचा नेता कधी धनगर होऊ शकत नाही. मेंढ्यांचा नेता कधी धनगर होऊ शकत नाही. बैलांचा नेता कधी ससा होऊ शकत नाही. तसं तुमचा नेता तुम्ही निवडायचा आहे आणि त्यांनी याच परिषदेत भाकीत करून ठेवलं की हे जे डॉ. बाबासाहेब आंबेडकर आहेत हे उद्याचे सबंध अस्पृश्यसमाजाचे नव्हे तर संपूर्ण भारताचे नेते होतील आणि ते जर एखादा पक्ष स्थापन करत असतील तर त्या पक्षात मला एक कार्यकर्ता म्हणून काम करायलासुद्धा आवडेल असे हे त्यांनी माणगाव परिषदेत सांगून ठेवले होते.

राजर्षी शाहू महाराजांनी स्त्रियांच्या मुक्तीच्या प्रश्नाला हात घातला. त्या काळात स्त्रियांवर अनेक बंधने होती आणि ती बंधने मनुस्मृतीतून आलेली होती. बालविवाहाचा प्रश्न होता शाहू महाराजांनी लग्नाचे वय वाढवून दिलं. विधवाविवाहास मान्यता नव्हती त्यांनी विधवाविवाहास मान्यता देण्याचा कायदा केला. मुली शाळेत जात नव्हत्या. त्यासाठी त्यांनी पालकांचे प्रबोधन केले. मुलींना शहरात राहण्याची सोय व्हावी म्हणून त्यांनी वसतिगृह तयार केली. जे पालक मुलींना शाळेत पाठविणार नाहीत अशावर कारवाईला सुरुवात केली. त्यांच्या तब्येतीची काळजी घेण्यास सुरुवात केली. आज जी शासनाची मध्यान भोजनाची योजना आहे तिची सुरुवात राजर्षी शाहू महाराजांनी केली होती. मुलीपण नुसत्या शिकल्या आणि त्यांच्या विकासाला संधी मिळाली नाही तर त्यापण ज्ञानापासून, शिक्षणापासून दूरदूर जातील म्हणून त्यांनी स्त्रियांना नोकरी देण्यास सुरुवात केली. महाराजांच्या संस्थानात एक मुलगी डॉक्टर झाली होती. तिची त्यांच्या संस्थानातील हॉस्पिटलमध्ये प्रमुख म्हणून महाराजांनी नियुक्ती केली होती. शिक्षण उपयोगी कसे पडते हे पण सांगायला पाहिजे आणि त्याचा उपयोग तुमच्या एकाच पिढीस होत नाही तर येणाऱ्या दोन-चार पिढ्यासाठी त्याचा उपयोग होतो हे सुद्धा ते आवर्जून सांगत होते.

विधवाविवाहस मान्यता देत असतानाच त्यांनी आणखी एका गोष्टीत लक्ष घातलं. पूर्वी विधवांना घराबाहेर पडायला बंदी होती. अंधाराने भरलेल्या कोठडीतच त्यांना राहावे लागत असे. दुर्दैवाने एका अपघातात महाराजांचे स्वतःचे पुत्र जेव्हा वारले तेव्हा आपल्या तरुण विधवा सुनेला त्यांनी बाहेर काढला शिक्षण दिलं आणि शिक्षण खात्याचा कारभार त्यांच्याकडे सुपूर्द केला. विधवांना चिकटलेल्या पाप- पुण्याच्या सगळ्या कल्पना त्यांनी खोडून टाकल्या. स्त्रियांना सगळ्या गोष्टी मिळाल्या पण प्रतिष्ठा मिळाली नाही, आत्मसन्मान मिळालं नाही तर काय होणार असा प्रश्न त्याच्यासमोर उभा होता. तो आत्मसन्मान देण्यासाठी काय काय करता येईल याचा त्यांनी विचार केलेला होता. जसं की शिक्षणाचा अधिकार, काय शिकावे, लग्न ठरविण्याचा अधिकार, लग्न कोणाशी करावे याचा अधिकार, घटस्फोट घ्यावा की नको याचा अधिकार असे अनेक अधिकार महाराजांनी त्यांच्या संस्थानात दिले होते आणि त्यासाठी कायदे केले होते. अशा असंख्य गोष्टी होत्या ज्याच्यातून त्यांनी एकाच वेळेस सुधारणा, न्याय आणि सामाजिक न्याय असा त्यांनी प्रवास चालू केलेला होता. सामाजिक न्यायाची गरज कोणाला असते? जो समाजात अल्पसंख्याक असतो, दुबळा असतो, शक्तीही नसतो त्याला केवळ न्याय देऊन चालत नाही तर राजर्षी शाहू महाराजांच्या मते, त्याला सामाजिक न्याय द्यावा लागतो.

**सामाजिक न्याय :**

सामाजिक न्याय ही मजेशीर पण महत्त्वाची गोष्ट आहे. ती सर्वांसाठी समान कायदे करून न्याय देता येत नाही. सर्वांना कायद्यासमोर समान मानून सामाजिक न्याय देता येत नाही. शाहू महाराजांनी सर्वांसाठी शिक्षण हे सक्तीचे केल होत पण त्याच्या पुढे जाऊन त्यांनी जो दुर्बल आहे, जो अस्पृश्य आहे त्याला सगळ्या गोष्टी देऊन शाळेत आणायचे म्हणजे येथे महाराजांनी एका अर्थाने असमान कायदाच केला होता. कारण तो केल्याशिवाय अल्पसंख्याकांना, महिलांना आणि कनिष्ठ जातींना न्याय मिळत नाही. सगळ्यांनाच नोकरीसाठी संधी आहे पण नोकरीची स्पर्धा जर सवर्ण आणि अस्पृश्य यांच्यामध्ये झाली तर यामध्ये सवर्ण जिंकणार हे महाराजांना माहीत होते. म्हणून परीक्षेत मुलाखत कशी द्यायची हे दरबारातले पैसे खर्च करून महाराजांनी शिकलेल्या मुलांना मुलाखतीचे तंत्र सुद्धा अवगत करून घेण्याची संधी देत होते.

राजर्षी शाहू महाराजांना जेंव्हा राखीव जागेचा प्रश्न पुण्यातील एका विद्वानांनी विचारला होता , तुम्ही स्पर्धा सर्वांच्यासाठी खुली ठेवा, कायदा सर्वांचेसाठी सामान ठेवा पण तुम्ही राखीव जागा का ठेवता? ज्याला नोकरी करायची आहे तो स्पर्धेत जाईल स्पर्धा करेल आणि त्याला नोकरी मिळेल. फार झालं तर जात-पात पाहू नका. पण राखीव जागा कशासाठी? शाहू महाराजांनी त्या विद्वानांना आपला मुद्दा पटवून देण्यासाठी जे उदाहरण दिले, जो प्रयोग करून दाखविला तो

महाराष्ट्राच्या सामाजिक चळवळीतला एक क्रांतिकारी प्रयोग म्हणून प्रसिद्ध आहे. राखीव जागावर आक्षेप घेणाऱ्या माणसाला त्यांनी घोडी बांधण्याच्या पागेमध्ये घेऊन गेले. तिथे वेगवेगळ्या प्रकारची घोडी त्यांच्या त्यांच्या पिंजऱ्यामध्ये होती. त्यामध्ये तरून घोड, म्हातारी घोड, थकलेल घोड आणि महाराजांनी त्या माणसाला सांगितले की, आता तुमच्या मतानुसार आपण या घोड्यामध्ये स्पर्धा घेऊ. स्पर्धेत जो जिंकेल त्याला लाभ होईल. महाराजांनी सर्व घोडयांना दिसेल अशा चौकात गवताच्या दोन-तीन पेंडया ठेवल्या आणि सगळया घोड्यांच्या पिंजऱ्याची दारे मोकळे करून जो घोडा येईल तो खाईल आणि जिंकेल त्यावर ते विद्वान ग्रहस्त म्हणाले हीच भारी आयडिया आहे. अशीच स्पर्धा घ्या.

तेंव्हा एकाच वेळी सर्व घोडयाना पिंजऱ्यातून सोडून दिले. तेव्हा त्यातील जे सशक्त घोडे होते त्यांनी दोन-तीन छलांग मारून सर्व गवताच्या पेंडया फस्त केल्या आणि म्हातारी घोडी लंगडत लंगडत, धापा टाकीत येईपर्यंत सशक्त घोडयांनी सगळ्या गवताच्या पेंडया फस्त करून टाकल्या होत्या. मग शाहू महाराजांनी त्या गृहस्थाला विचारलं की, हा म्हातारा घोडा आहे. याला जगवायचं कसं? कारण तो स्पर्धेत टिकू शकत नाही आणि इतर घोडयाप्रमाणे धावत जाऊन गवताच्या पेंडीपर्यंत पोहचू शकत नाही. याच करायचं काय? शाहू महाराजांच्या मते याचं एकच उत्तर आहे जो स्पर्धेत टिकू शकत नाही, जो धावू शकत नाही त्याला लाभ देण्यासाठी आपण त्याच्या पर्यंत गेलो पाहिजे. म्हातारा घोडा जगवायचा असेल तर गवत त्याच्यापर्यंत घेऊन जायला पाहिजे. त्याला स्पर्धेत घालून मारायचं काही कारण नाही. तेव्हा त्या पुण्याच्या विद्वान गृहस्थाला महाराजांचे म्हणणं पटलं. महाराजांचा हा सामाजिक न्यायाचा प्रयोग होता. त्यांच्या मते, सर्वांना सारख्या नोकऱ्या ठेवून उपयोग नाही. नोकरी पकडण्याची क्षमता त्याच्यामध्ये निर्माण करायला पाहिजे म्हणजे तो नोकरी पकडू शकतो. जिथे-जिथे अभाव असेल तेथे अशां सगळ्या गोष्टी दूर करून त्यांच्यामध्ये क्षमता तयार करून आणि त्याच्यासाठी वेगळा कायदा करणं, वेगळा नियम करणे गरजेचे होते. कारण त्याच्यातूनच सामाजिक न्यायाचा मार्ग जाणार होता.

राजर्षी शाहू महाराजांच्या मते, शिक्षण सक्तीचे केलं पण पोरं आणायची कुठून? त्यामुळे पोरं आणण्यासाठी वेगळा कायदा, ती टिकवून कशी ठेवायची त्यासाठी वेगळा कायदा याला आपण सामाजिक न्याय म्हणतो. दुर्बलापर्यंत व्यवस्थेने स्वतः जाण्याचा मार्ग त्याच्यावर कोणत्याही प्रकारचा अन्याय होऊ नये आणि तो स्पर्धेत टिकण्यासाठी सुद्धा सक्षम व्हायला पाहिजे. नाहीतर विषम स्पर्धा होते. जर आपण आज असा विचार केला की, आय.ए.एस अधिकाऱ्याचा पोरगा आणि मोलकरणीचा पोरगा या दोघांनी यूपीएससीची परीक्षा देण्यास संधी आहे. कोणालाही जातीच्या नावावरून अडविले जात नाही. पण ही परीक्षा विषम आहे. कारण तो आय.ए.एस अधिकाऱ्याचा पोरगा आहे आणि दुसरा हमालाचा पोरगा आहे. उद्या स्पर्धा अशी झालीच तर जिंकणार कोण हे अगोदर ठरलेले आहे. त्यामुळे सशक्ताशी टक्कर देण्यासाठी दुबळ्यामध्ये टक्कर देण्याचे सामर्थ्य जाणीवपूर्वक निर्माण केले पाहिजे म्हणजे सामाजिक न्याय. नाहीतर हे मॅच फिक्सिंग सारखं होईल. कारण तुम्ही कोणाबरोबरही लढायला दुर्बलांना परवानगी देणार आणि प्रत्येक वेळी दुर्बलच पराभूत होणार. कारण स्पर्धेत नुसता प्रवेश देऊन चालत नाही तर स्पर्धेत टिकण्यासाठीच सामर्थ्यसुद्धा संबंधितांमध्ये तयार करावा लागत आणि सामाजिक न्यायाच्या अंगान राजर्षी शाहू महाराज तयार करीत होते.

महाराजांनी आपला विचार संस्थांनापुरता मर्यादित न ठेवता तो संस्थांनाबाहेर पोहोचविला. अनेक शिक्षण संस्थाना त्यांनी मदत केली. अनेक मेळाव्याना ते हजर राहिले. महात्मा फुल्यांनी जे पुण्यापुरतं काम करून ठेवलं होतं ते मग सत्यशोधक चळवळच असेल, सत्यशोधक समाजाच असेल, भडजीशिवाय लग्न करावयाची पद्धत असेल ह्या सगळ्या गोष्टी त्यांनी कोल्हापूर संस्थानात आणून कोल्हापूर संस्थान समग्र क्रांती करावयाला, समग्र परिवर्तन करावयाला आणि सामाजिक न्याय द्यायला निघालेले एक संस्थान आहे हे त्यांनी कृतीतून सिद्ध केले.

**निष्कर्ष :**

. राजर्षी शाहू छत्रपतींनी जातीनिर्मूलन चळवळीला बळ दिले. स्वतःच्या बहिणीचा आंतरजातीय विवाह करुन दिला. आंतरजातीय विवाहाचा कायदा केला. व्यवसाय परिवर्तनाचे महत्त्व ओळखून महाराज गंगाराम कांबळेंना हॉटेल सुरु करुन देतात. भटक्या विमुक्तांचा जनसमूह हा मागासांमधला अधिक मागास समूह आहे. महाराजांनी त्यातल्या फासेपारध्यांच्या विकासासाठी विविध उपाययोजना केल्या. त्यांची हजेरी बंद केली. महाराजांनी वेठबिगारी आणि अस्पृश्यता कायद्याने बंद केली. स्त्रियांच्या मुक्तीच्या प्रश्नाला हात घातला. देवदासी निर्मूलनासाठी पुढाकार घेतला. कोल्हापूर हे शिक्षणाचे आधुनिक केंद्र बनवण्यासाठी महाराजांनी अनेक शैक्षणिक उपक्रम राबवले. गाव तेथे शाळा अशी देशात सर्व प्रथम घोषणा देऊन तिची अंमलबजावणी केली. भारतीय परिस्थितीत सामाजिक न्याय हा अत्यंत महत्वाचा विचार आहे. राजर्षी शाहू महाराजांनी

NAVJYOT / Vol. XV / Issue – I ISSN 2277-8063

त्याचे महत्व ओळखून विसाव्या शतकाच्या प्रारंभापासून सामाजिक न्यायाच्या धोरणाची समग्र अंमलबजावणी सुरु केलेली दिसून येते.

**संदर्भ ग्रंथ :**


१. भोळे भा. ल. (२००६) 'राजकीय सिद्धांत', पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर, चौथी आवृत्ती.
२. नरके हरी (२००३) सामाजिक न्यायाचे शिल्पकार : राजर्षी शाहू महाराज, (सं) भूषण गगराणी, लोकराज्य अंक ७ वर्ष ५५ वे, प्रकाशक माहिती व जनसंपर्क महासंचालनालय महाराष्ट्र शासन.
३. पवार जयसिंगराव (सं) २००७, 'राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ', महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर.
४. साळुंखे नानासाहेब (२०१६) 'शाहूंच्या आठवणी', वृषाली प्रकाशन, कोल्हापूर.
५. कांबळे उत्तम (सं) २०२२, 'राजर्षी शाहू महाराज विचारधारा', लोकवाडमय गृह, मुंबई.